**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

सचिव कार्यालय
दिनांकः- ८/५/२००८

**प्रति,**

मा.सदस्य ---------------
स्थायी समिती,.
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा **क्र.४ मंगळवार दिनांक ३/५/२००८रोजी दुपारी १.००** वाजता स्थायी समिती कार्याल्यात खालील विषयावर विचार - विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण सर्वांनी उपस्थित रहावे हि विनंती.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- ४**

**सन-२००८-२००९**

**मंगळवार दिनांक. १३/५/२००८ची विषय पत्रिका.**

**विषय क्रं.** **विषय**

१. मा.स्थायी समिती सभा क्रमांक ३ मंगळवार दिनांक २९/४/२००८रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

२. अहमदनगर महानगपालिकेच्या हद्यीमध्ये तीस ठिकाणी शहर बस थांबे निवीदाकार मे.उपेंद्र पब्लिसिटी औरंगाबाद यांना बी.ओ.टी तत्वावर विकसीत करणेस मंजूरी देणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

३. अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १२ प्रोफेसर कॉलनी चौक ते प्रेमदान चौका दरम्यान रस्त्याचे दोन्ही बाजूस फुटपाथ करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

४. अहमदनगर महानगरपालिकेचे जकात विभागा कडेस " तज्ञ सल्लागार " म्हणून मानधनावर नेमणुक मिळणे बाबत अर्जदार श्री प्रकाश बबनराव लोळगे,श्री रमेश हरीराम शर्मा व श्री शंकर हसानंद देवानी यांचा अर्ज मा.स्थायी समितीपुढे निर्णयास्तव सादर.

५. अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह येथे बालरोग तज्ञ म्हणून डॉ. श्री. सुभाष फिरोदिया, डॉ.श्री. अनिसध्द गिते व डॉ.श्री.सुचित तांबोळी यांची बालरोग तज्ञ म्हणून दिनांक ५/१०/२००७ ते दि. ४/१०/२००९ अखेर दोन वर्षासाठी दरमहा रूपये १५०० चे मानधनावर नेमणूक करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

६. अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीतील महात्मा फुले चौक ते सारसनगर पुला पर्यत रस्ता कॉक्रीट करणे कामी मागविण्यात आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

७. अहमदनगर महानगरपालिकेची शहर बस सेवा चालविण्यांस दिलेल्या अहमदनगर प्रवासी व माल वाहतुक संस्थेचे बॅन्क गॅरंटी मधून तुर्त रक्कम रूपये ५,९१,२००/- बॅन्केचे कर्ज हप्तापोटी भरणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत**- मा.स्थायी समिति सभा क्रमांक - ३ मंगळवार दिनांक २९/४/२००८ रोजीच्या सभेचे इतिवृत्ताची प्रत व विषय-क्रमांक २ व ५ ते ७ च्या प्रस्तावांच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-४**
सन २००८-२००९.

विषय क्रमांक-१ मंगळवार दिनांक १३/५/२००८

ठराव क्रमांक -१ मंगळवार दिनांक १३/५/२००८

**प्रस्तावाचा विषय** :- मा.स्थायी समिती सभा क्रमांक ३ मंगळवार दिनांक २९/४/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकूर :-**मा.स्थायी समिती सभा क्रमांक ३ मंगळवार दिनांक २९/४/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे साठी मा.स्थायी समिती सभे पुढे ठेविले.

सबब इतिवृत्त मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेबः- मागिल सभा दिनांक २९/४/२००८ रोजीचे सभेचे इतिवृत्त कायम करणे आहे.

मा.उपायुक्त श्री.हांगे साहेबः- मागिल सभेचे इतिवृत्त कायम करणे आहे. त्या बाबत मा.सदस्यांनी आपल्या सुचना, दुरूस्त्या सांगाव्यात.

मा.श्री. शिंदे द.बा.ः- इतिवृत्त मंजूर करावे.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. :- मागिल सभेचे इतिवृत्त कायम करावे.

मा.सभापती साहेब :- मागिल सभा दिनांक २९/४/२००८ रोजीचे सभेचे इतिवृत्त सर्वानुमते मंजूर करावे.

**ठरावः-**मा.स्थायी समिती सभा क्रमांक ३ मंगळवार दिनांक २९/४/२००८ रोजीचे सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा.श्री. शिंदे दशरथ बाबु

अनुमोदक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन
ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-४**
सन २००८-२००९.

विषय क्रमांक-२ मंगळवार दिनांक १३/५/२००८

ठराव क्रमांक -२ मंगळवार दिनांक १३/५/२००८

**प्रस्तावाचा विषय** :-अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये तीस ठिकाणी शहर बस थांबे निविदाकार मे.उपेंद्र पब्लिसिटी,औरंगाबाद यांना बी.ओ.टी.तत्वावर विकसित करणेस मंजूरी देणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** प्रस्तावना-अहमदनगर शहर व उपनगरामध्ये तीस शहर बस थांबे बी.ओ.टी. तत्वावर बनविणेबाबत.

विषय :-अहमदनगर शहर व उपनगरामध्ये तीस शहर थांबे बनविणेबाबतचा प्रस्ताव.

**प्रस्तावानुसार संक्षिप्त टिप्पणी**

अहमदनगर शहर व उपनगरांमध्ये तीस शहर बस थांबे बी.ओ.टी तत्वावर बनविणकामी दै. सामना दि. १४/३/०७ रोजीच्या पेपरमध्ये निविदा प्रसिध्द करून निविदा मागविल्या असता मुदतीमध्ये तीन निविदा प्राप्त झाल्या होत्या त्या खालीलप्रमाणे.

१. मे.उपेंद्र पब्लिसिटी, ॲडव्हरटायझर, औरंगाबाद
२. चंगेडीया आउट्रडोअर्स, अ.नगर
३. फ्लॅश पब्लिसिटी, ॲडव्हरटायझर, अ.नगर

वरील तीनही निविदाकार यांच्या तीनही निविदा दि. ३/४/०७ रोजी उघडून निविदाकार यांना दि. १९/४/०७ रोजी निगोसिएशनच्या वेळी चर्चेसाठी बोलविले असता मे. फ्लॅश पब्लिसिटी, अ.नगर यांनी चर्चेच्या वेळी पत्र देवुन बस थांबा बनविणेस सहमती दर्शविली नाही. तसेच उपेंद्र पब्लिसिटी, औरंगाबाद व मे. चंगेडिया आउट्रडोअर्स, अ.नगर यांचेशी चर्चा करून त्यांना बस थांबा व डिझाइन निश्चित करून बी.ओ.टी तत्वावर एक बस थांबा बनविणे कामी सुचविले त्यानुसार जा.नं. २२८ दि. २८/५/०७ अन्वये मे.चंगेडिया आउट्रडोअर्स मार्केट, अ.नगर यांना एक बस थांबा बनविणेकामी तीन दिवसात करारनामा करून देणेबाबत कळविले असता त्यांनी करारनामा करून दिलेला नाही व बस थांबा बनविणे कामी सहमती दर्शविली नाही.

त्यामुळे मे. चंगेडिया आउट्रडोअर्स, अ.नगर यांना दिलेला आदेश रद्द करून मे. उपेंद्र पब्लिसिटी औरंगाबाद यांना प्रायोगिक तत्वावर बस थांबे बनविणेकामी मा.आयुक्त साहेब यांनी दि.२५/७/०७ रोजी मंजुरी दिलेली आहे.

त्याप्रमाणे मे.उपेंद्र पब्लिसिटी औरंगाबाद यांनी प्रायोगिक तत्वावर दोन बस थांबे बनवुन एक प्रोफेसर कॉलनी, शॉपींग सेंटरजवळ व दुसरा अंबिकानगर केडगांव येथे बनविलेले आहेत.

शहरामध्ये वेगवेगळया ठिकाणी तसेच उपनगरांमध्ये नवीन तीस बस थांबे बनविणे करिता मे. नगररचनाकार यांचेकडील जा.नं. ४२७६ दि. २६/१२/०७ व जा.नं. ४६९७ दि. १७/०१/०८ अन्वयेचे ठिकाणे निश्चित करणेत आलेली आहेत. तरी सदर तीस वेगवेगळया ठिकाणी बी.ओ.टी तत्वावर बस थांबे बनविणे करिता मा.स्थायी समिती सभेपुढे ठेवणे कामी मा.आयुक्त साहेब यांनी दि. १८/१/०८ रोजीच्या प्रस्तावावर मान्यता दिलेली आहे. तरी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे मंजुरीबाबत निर्णयास्तव अहवाल सादर.

येणे प्रमाणे सहाय्यक मुल्य निर्धारक कर संकलन अधिकारी यांचा अहवाल असे. दि.२९/३/०८

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय** :-अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये तीस ठिकाणी शहर बस थांबे निविदाकार मे.उपेंद्र पब्लिसिटी,औरंगाबाद यांना बी.ओ.टी.तत्वावर विकसीत करणेस मंजूरी देणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. कोतकर भा.ए. :- सदरचे बस थांब्याचे जागेचे भाडे संबंधीत संस्था म.न.पास देणार आहे का ?

जकात अधिक्षक श्री. पवळे एन.एम. :- आपण त्यांनी बी ओ टी तत्वावर बस थांबे बांधण्यासाठी जागा देणार आहोत. बसथांब्याचे बांधकाम संबधीत ठेकेदार स्वखर्चाने करणार आहे बसथांब्यावर त्याचे मार्फत जाहिरात करण्यांत येणार आहेत.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.उपायुक्त श्री हांगे साहेब :- सदरचे संस्थेने अंबिकानगर,केडगांव येथे एक व प्रोफेसर कॉलनी शॉपींग सेंटर जवळ एक या प्रमाणे दोन बस थांब्याचे बांधकाम प्रायोगिक तत्वावर केलेले आहे. शहर अभियंता आपण त्यांची पहाणी केली आहे का ?आपले दृष्टीने बांधकामाचा दर्जा कसा आहे.

शहर अभियां श्री.पालवे व्ही.डी.:- सदर बस थांब्याचे बांधकाम चांगल्या दर्जाचे झालेले असून बसथांब्यामुळे शहराची शोभा वाढणार आहे.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. शिंदे द.बा.:- मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार मे.उपेंद्र पब्लिसिटी, औरंगाबाद यांना बस थांबे बी.ओ.टी. तत्वावर विकसीत करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये तीस ठिकाणी शहर बस थांबे निविदाकार मे.उपेंद्र पाब्लिसिटी ॲडव्हरटायझर औरंगाबाद यांना बी.ओ.टी तत्वावर विकसीत करणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन

अनुमोदक :- मा.श्री. शिंदे दशरथ बाबु

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,<br>
स्थायी समिती<br>
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-४**
सन २००८-२००९.

विषय क्रमांक-३ मंगळवार दिनांक १३/५/२००८

ठराव क्रमांक -३ मंगळवार दिनांक १३/५/२००८

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १२ प्रोफेसर कॉलनी चौक ते प्रेमदान चौका दरम्यान रस्त्याचे दोन्ही बाजूस फुटपाथ करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** प्रस्तावना-विषय-निविदा मंजुरी बाबत.

कामाचे नांव :- प्र.क्र. १२ प्रोफेसर कॉलनी चौक ते प्रेमदान चौकादरम्यान रस्त्याचे दोन्ही बाजूस फुटपाथ करणे.

उपरोक्त विषयी खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१. प्रशासकीय मान्यता :- मा.स्थायी समिती ठराव क्र. ५ दि. २६/१०/२००७
२. प्रशासकीय मान्यता रक्कम रू. :- २०,१६,६१९/-
३. तांत्रिक मान्यता रक्कम रू. :- २०,१६,६१९/-
४. तांत्रिक मान्यतेची दरसुची :- सन-०७-०८
५. निविदा ( परिशिष्ट 'ब') रक्कम रू. :- १९,३६,१०६/-
६. निविदा प्रसिध्दी तारीख :- २४/११/२००७
७. निविदा विक्री कालावधी :- २७/११/२००७ ते १२/१२/२००७ ( १५ दिवस)
८. निविदा स्विकारण्याची तारीख :- १५/१२/२००७
९. निविदा उघडण्याची तारीख :- १८/०१/२००८
१०. कामाची मुदत :- ६ महिने
११. प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील खालीलप्रमाणे

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | देकार |
|---|---|---|
| १ | श्री. एम.व्ही. दराडे | ११.११% कमी |
| २. | श्री. विजय म्हस्के | ३.४० % कमी |
| ३ | श्री. हर्षद शिंदे | ७.१० % कमी |
| ४ | श्री. संजय चितळकर | २.५ %कमी |
| ५ | श्री. गिरीष खेडकर | १०.२१ %कमी |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने श्री. एम.व्ही. दराडे, अ.नगर यांचा देकार सर्वात कमी म्हणजे निविदा रकमेपेक्षा ११.११% कमी आहे

तरी सदर प्रस्ताव छाननी समिती समोर दिनांक २६/०२/२००८ रोजी ठेवला असता छाननी समितीने सदरची दरसुची सन २००७-०८ नुसार असल्याने ठेकेदाराचा देकार ११.११ % कमी ने मंजूर करणेस शिफारस करण्यात आलेली आहे. उपरोक्त निविदा मा.स्थायी समिती समोर निर्णयास्तव ठेवणेकरिता मा.आयुक्त यांनी दि. २९/३/२००८ अन्वये मान्यता दिलेली आहे.

तरी सदरची निविदा मा.स्थायी समिती मार्फत प्रशासकीय मंजूरीस्तव सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १२ प्रोफेसर कॉलनी चौक ते प्रेमदान चौका दरम्यान रस्त्याचे दोन्ही बाजूस फुटपाथ करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. तिवारी सु.र.:- सदर फुटपाथ करणे करीता जागा नसल्याचे आढळते काम कसे करणार.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- सदरचा श्री दत्त मंदिरा समोरील ५० फुटी रस्ता असुन तेथे कामास जागा आहे.

मा.श्री. शिंदे द.बा. :- मागिल सभे मध्ये सदरचे कामाचे जागेची पहाणी करून निर्णय घ्यावा अशी मी सुचना केली होता.

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी. :- सदरचे प्रेमदान चौक ते प्रोफेसर कॉलनी पर्यतचे रस्त्याचे कामापैकी ड्रेनेज चेंबर चे काम ही पूर्ण झालेले आहे. आलेले निविदा दर हे कमीचे प्राप्त झालेने मंजूरीस शिफारस केलेली आहे. मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. कोतकर भा.ए. :- जागा पहाणी करणे असल्यास मा.सभापती साहेब यांना त्याबाबत निर्णय घेणेचे अधिकार द्यावेत.

मा.श्री. शेख अरिफ शे.र. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. शिंदे द.बा.:- मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १२ प्रोफेसर कॉलनी चौक ते प्रेमदान चौका दरम्यान रस्त्याचे दोन्ही बाजूस फुटपाथ करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता छाननी समितीने शिफारस केल्यानुसार तुलणात्मक दृष्टया कमीचे निविदा दर धारक श्री. एम.व्ही दराडे अहमदनगर यांचे निविदा रकमे पेक्षा ११.११ % (आकरा पूर्णाक आकरा शतांश टक्के) कमीचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन

अनुमोदक :- मा.श्री. शिंदे दशरथ बाबु

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-४**
सन २००८-२००९.

विषय क्रमांक-४ मंगळवार दिनांक १३/५/२००८

ठराव क्रमांक -४ मंगळवार दिनांक १३/५/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे जकात विभागाकडेस " तज्ञ सल्लागार" म्हणून मानधनावर नेमणूक मिळणे बाबत अर्जदार श्री. प्रकाश बबनराव लोळगे, श्री. रमेश हरीराम शर्मा व श्री. शंकर हसानंद देवानी यांचा अर्ज मा.स्थायी समितीपुढे निर्णयास्तव सादर.

**प्रस्तावाचा मजकुर :-** प्रतिवेदक-१) प्रकाश बबनराव लोळगे,वय-३२ वर्षे मो.नं. ९८२२६१८३०२
रा-रेणावीकर मार्केट, सराफबाजार ,अ.नगर
२) रमेश हरीराम शर्मा, वय-३२ वर्षे मो.नं. ९८६७१८५३१८
रा-आगरकर मळा, स्मृती कॉलनी,अ.नगर
३) शंकर हसानंद देवानी, वय-४२ वर्षे मो.नं. ९२२६२४४२८२
रा-आगरकर मळा, अ.नगर

**संदर्भ :-** दि. ०५/०४/२००८रोजी मा.आयुक्त साहेब, अ.नगर यांना आम्ही दिलेला अर्ज.

**विषय :-** जकात विभागात "तज्ञ सल्लागार" म्हणून मानधनावर नेमणुक करणे बाबत.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणास सविनय सादर करण्यात येते की, आम्ही अहमदनगर महानगरपालिकेच्या तात्कालीन ठेकेदार ' साई एंटरप्राईजेस' ' सहकारी एजन्सी प्रा.ली.' विविध शहरात ' कोणार्क ','यश एंटरप्राईजेस' या कंपनीमध्ये जकात विभागात विशेष पथकात कार्यरत होतो. दरम्यान काळात आम्ही कंपनीस कायदेशीररित्या जकात वसुली करणेकामी सहकार्य केले आहे. नगर शहरात होणा-या जकात माफियांकडून जकात चोरीबाबत नियंत्रण ठेवून जकात चोरीला आळा बसविला होता. तसेच बाजापेठेत येणा-या मालाची मुळ किंमत आम्हाला माहित आहे. त्यामुळे मालाची कमी किंमत दाखवून कमी जकात करून घेणा-यांवर देखील विशेष नियंत्रण ठेवले होते. जेणेकरून उक्त कंपन्यांच्या जकात वसुलीत वाढ झालेली होती.

सद्यस्थितीत आपण जकात वसुली ही महानगरपालिकेच्या कर्मचा-यांमार्फत करत आहात. सदर विभागात आम्हाला आपण "तज्ञ सल्लागार" म्हणून मानधनावर घेतल्यास महापालिकेच्या जकातीच्या उत्पन्नात आम्ही निश्चित भरीव वाढ करून देउत्र.

तरी उपरोक्त बाबींवर सहानुभुतिपूर्वक विचार करून आपण आमची जकात विभागात " तज्ञ सल्लागार" म्हणून नेमणूक करावी ही विनंती.

येणे प्रमाणे श्री.प्रकाश लोळगे,श्री.रमेश शर्मा,श्री. शंकर देवानी यांचा अर्ज असे.दि. २२/४/०८
सबब मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे जकात विभागाकडेस "तज्ञ सल्लागार" म्हणून मानधनावर नेमणूक मिळणे बाबत अर्जदार श्री. प्रकाश बबनराव लोळगे, श्री. रमेश हरीराम शर्मा व श्री. शंकर हसानंद देवानी यांचा अर्ज मा.स्थायी समितीपुढे निर्णयास्तव सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. कोतकर भा.ए. :- जकात अधिक्षक श्री. पवळे यांना सभेत बोलवावे.

मा.सभापती साहेब :-मागिल सभे मध्ये शहर अभियंता हजर नव्हते. तसेच अजेंडया वरील विषयाशी संबंधीत शाखा अभियंते ही उपस्थित नव्हते.त्यामुळे प्रस्तावाची सविस्तर माहिती न मिळाल्याने एक विषय तहकुब करून या सभेत मंजूरीस्तव घेतलेलाआहे.

मा.श्री. कोतकर भा.ए.:- स्थायी समितीची सभा महत्वाची असून संबंधीत अभियंत्याना वेळोवेळी सुचना देउन्नही ते सभेत गैरहजर रहातात. ते अनुपस्थीत राहून मा.सभापती यांचा तसेच मा. स्थायी समिती सभेचा अवमान करतात.त्यांचे वर प्रशासाने कडक कार्यवाही करावी.

मा.सभापती साहेब :- श्री. पवळे जकात अधिक्षक यांना सभेत बोलवावे.

त्याप्रमाणे श्री. पवळे एन.एम. जकात अधिक्षक हे सभे मध्ये उपस्थित झाले.

मा.श्री. कोतकर भा.ए.:- तज्ञ जकात सल्लागाराच्या नेमणूका करणे आहेत.

जकात अधिक्षक श्री.पवळे एन.एम.:-तज्ञ सल्लागार म्हणून नेमणूक मिळणे बाबत अर्जदार यांचा अर्ज आहे.

मा.उपायुक्त श्री.हांगे साहेब :- संबंधीत अर्जदार यांनी जकात विभागाकडेस तज्ञ जकात सल्लागार म्हणून नेमणूक मिळणे करिता प्रशासनाकडेस अर्ज केला होता. परंतु मु.प्रा. म.न.पा. अधिनियमात अशा नेमणूका करणे विषयी तरतूद नाही. त्यामुळे स्थायी समिती कडे प्रस्ताव पाठविलेला नाही. अर्जदार यांना नेमणूका देता येणार नसलेने नकार दिला असता त्यांनी मा.स्थायी समिती सभापती साहेबांकडेस अर्ज देउन्न नेमणूका करणे विषयी विनंती केली आहे.त्यामुळे मा.सभापती महोदय यांनी सदर विषय सभेत घेतलेला आहे.

मा.श्री.कोतकर भा.ए.:- जकात वसुलीची परिस्थिती काय आहे.?

जकात अधिक्षक श्री.पवळे एन.एम. :- दिनांक ३०/४/०८ अखेर एकूण वसुली ३ कोटी ७८ लाख २९ हजार ९३७/- इतकी झालेली असून त्यामध्ये २ कोटी ३३ लाख १८ हजार ८७७/- अशी जकात वसुली व पारगमन फी रू. १,४५,११,०६०/- इतकी वसुल झालेली आहे. १ मे पासून जकात वसुली सुरू झालेली असून कालचा भरण रूपये १५ लाख ब्याण्णव हजार होता. सरासरी भरणा रू. १३ लाखापर्यत जातो.

मा.श्री. कोतकर भा.ए.:- जकात वसुली सरासरी १३ लाखाची होते आहे. सभापती साहेब अर्जदार यांचे काय म्हणणे आहे.

मा.सभापती साहेबः-जकात वसुलीचा भरणा रूपये पंधरा लाखापर्यत वाढवून देउ असे अर्जदारांचे म्हणने आहे.

मा.श्री. मैड स.ब.:- या नेमणूकांस प्रशासनाची मंजूरी मिळेल का ?

मा.श्री. कोतकर भा.ए.:- नेमणूक केल्यास आपण तोटयात येतो का हे पहावे.

मा.सभापती साहेब :- मागिल जकात अभिकर्त्याचे रोजचे वसुली ची आकडेवारी आहे का?

जकात अधिक्षक श्री. पवळे एन.एम. :-जकात अभिकर्त्याचे जकात वसुलीची रोजची माहिती आपले कडेस उपलभ्द नाही.

मा.श्री.मैड स.ब.:- तज्ञ सल्लागार १५ लाखापर्यत रोजचा भरणा वाढवून देउत्र असे म्हणतात. मग आपले कर्मचारी भरणा का वाढवत नाहीत.

जकात अधिक्षक श्री. पवळे एन.एम.:- सिझन मध्ये उत्पन्न वाढते आता लग्न सराई संपलेली आहे.

मा.श्री. कोतकर भा.ए.:-दररोजचा भरणा दोन ऐवजी एका लाखाने जरी वाढला तरी म.न.पा.चेच उत्पन्न वाढेल मग आपली या नेमणूकांस अडचण काय त्यांना अनुभव आहेत का ?

मा.सभापती साहेब :- त्यांनी मागिल जकात अभिकर्त्या कडे काम केलेले असून जकात वसुली बाबत त्यांना माहिती आहे. त्याचा अर्ज सभेत वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे अर्जदार यांचा अर्ज सभेत वाचून दाखविला.

मा.श्री. मैड स.ब.:- जकात वसुलीत आपण कुठे कमी पडतो. त्यांना माहिती आहे.आपले कर्मचा-यांना त्याबाबत माहिती नाही का ?

मा.श्री. कोतकर भा.ए.:- त्यांना किती मानधन देणार ? किती अर्ज आलेले आहेत.

मा.सभापती साहेब :- श्री. लोळगे, श्री. शर्मा, श्री. देवाणी यांनी पूर्वीच अर्ज दिलेला असून माझ्या कडेस श्री. जामदार गजानन विठ्ठलराव यांचा अर्ज आलेला आहे.

मा.श्री. शिंदे द.बा.:- त्यांना रूपये दहा हजार दरमहा मानधन देण्यांत यावे. त्यांना दिड महिन्यासाठी नेमणेत यावे.

मा.श्री.मैड स.ब.:- सदर बाबत मा.सदस्यांची कमेटी नेमावी त्यांचे देखरेखी खाली जकात विभागाने काम करावे.

मा.श्री. तिवारी सु.र.:- या मानधनावर नेमणूका केल्यास म.न.पाचे नुकसान होईल. जकात अभिकर्त्या कडेस अनेक कर्मचारी कामास होते या तज्ञ सल्लागाराकडे असे विशेष काय आहे. यांनी काय काम केले याची माहिती काय ?

मा.श्री. कोतकर भा.ए.:- त्यांना दरमहा रूपये दहा हजार मानधन दिल्यास म.न.पा.चा चाळीस हजार रूपये खर्च दरमहा वाढेल परंतु त्यांनी दररोज रूपये एक, दोन लाखाचा भरणा वाढवून दिल्यास मनपाचा काय तोटा होणार?त्यांना ३० दिवसाकरिता नेमणूक द्यावी. मनपाचे उत्पन्न वाढेल.

मा.श्री. तिवारी सु.र.:- सदर प्रकरणी प्रशासनाची टिप्पणी घेण्यांत यावी.

मा.श्री. कोतकर भा.ए.:- अर्जदार यांच्या तज्ञ सल्लागार म्हणून जकात विभागाकडेस नेमणूका करण्यांस हरकत नाही त्यांचे काम समाधाक कारक नसल्यास त्यांना कमी करणेचे अधिकार आपलेकडेस ठेवावे.

मा.श्री.तिवारी सु.र.:-तज्ञ सल्लागार नेमणे कामी जाहिर नोटीस देण्यांत येउत्न नेमणूका कराव्यात.

मा.श्री. कोतकर भा.ए. :- ३० दिवसासाठी या नेमणूका केल्यास आपण तोटयात येत नाही .त्याना दहा हजार रूपये मानधन द्यावे. आपले मना प्रमाणे त्यांनी जकात वसुलीत वाढ केली नाही. तर त्यांना काढून टाकावे, महिना तीस ते पन्नास लाख जकातीची वसुली वाढली तरी मा.आयुक्त साहेब यांनी त्यांना नेमणूका देणे विषयी विचार करावा. पटले तर कामावर ठेवावे, अन्यथा काढून टाकावे.

मा.श्री.शिंदे द.बा.:- तीस दिवसाची नेमणूक अर्जदार यांना देण्यांत यावी.मानधन रू. दहा हजार दरमहा द्यावे.

मा.श्री. तिवारी सु.र.:- तज्ञ सल्लागाराचे नेमणूकास आम्हा विरोधकांचा विरोध नोंदवावा.आम्ही प्रशासनास तसे पत्र पूर्वीच दिलेले आहे.

मा.सभापती साहेब :- जकात विभागाकडेस तज्ञ सल्लागार म्हणून अर्जदार श्री.प्रकाश बबन लोळगे, श्री. रमेश हरिराम शर्मा, श्री. शंकर हसानंद देवानी व श्री. जामदार गजानन विठ्ठलराव यांना तीस दिवसासाठी नेमणेत यावे. तसेच यांना दरमहा मानधन रूपये दहा हजार फक्त देण्यांत यावे. ठराव बहुमताने मंजूर करावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे जकात विभागाकडेस " तज्ञ सल्लागार" म्हणून तीस दिवसाकरिता श्री. प्रकाश बबनराव लोळगे, श्री. रमेश हरीराम शर्मा व श्री. शंकर हसानंद देवानी तसेच श्री. जामदार गजानन विठ्ठलराव यांना दरमहा रूपये दहा हजार फक्त या मानधनावर नेमणूका करणेस मंजूरी देण्यांत येत आहे.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. कोतकर भानुदास एकनाथ सही/-

अनुमोदक :- मा.श्री. शिंदे दशरथ बाबु. सही/-

ठराव बहुमताने मंजूर.

सदरचे ठरावास मा.स्थायी समिती सदस्य मा.श्री. तिवारी सुरेश रतनप्रसाद, मा.सौ.गुरूड राधा रमेश, मा.सौ. मुदगल सुनिता दत्तात्रय, मा.सौ. शेंडगे रोहिणी संजय, मा. श्रीमती बोरूडे इंदूबाई परशुराम व मा.सौ. भागानगरे मनिषा प्रकाश यांचा विरोध

सही/-<br>
सभापती,<br>
स्थायी समिती<br>
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-४**
सन २००८-२००९.

विषय क्रमांक-५ मंगळवार दिनांक १३/५/२००८

ठराव क्रमांक -५ मंगळवार दिनांक १३/५/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह येथे बालरोग तज्ञ म्हणून डॉ.श्री. सुभाष फिरोदिया, डॉ.श्री. अनिरूध्द गिते व डॉ.श्री. सुचित तांबोळी यांची बालरोग तज्ञ म्हणून दिनांक ५/१०/२००७ ते दि. ४/१०/२००९ अखेर दोन वर्षासाठी दरमहा रूपये १५००/- चे मानधनावर नेमणुक करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** प्रस्तावना-विषय-मानधनावर बालरोग तज्ञाची नेमणुक करणेबाबत.

कै. बा.दे. दवाखाना व सुतिकागृह येथे बालरोग तज्ञ व डॉक्टरांची आवश्यकता नेहमी भासते. आस्थापना सुचिवर बालरोग तज्ञाचे पद मंजूर नसल्यामुळे बालरोग तज्ञ डॉक्टरांची ( ऑनररी बालरोग तज्ञ) मानधनावर नेमणुक करावी लागते.

मुळ प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या डॉक्टरांची मानधनावरील नेमणुका समाप्त होत असल्याने प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या डॉक्टरांची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५४ अन्वये तात्पुरत्या स्वरूपात सहा महिन्यांकरिता मानधनावर नेमणुक करण्यास व त्याकामी मानधनासाठी अंदाजे येणा-या खर्चास मंजूरी मिळावी ही विनंती.

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख व कामगार अधिकारी यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्यें वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती कडेस मंजूरी साठी उशिरा आलेला आहे.

मा.उपायुक्त श्री हांगे साहेब :-मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. श्री. टेकवाणी आलेले आहेत. त्यांना सभेमध्ये बोलवावे.

त्याप्रमाणे डॉ.श्री.पी.आर.टेकवाणी मुख्य वैद्यकीय अधिकारी सभे मध्ये उपस्थित झाले.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- प्रस्तावाची माहिती सांगावी.

मु.वै.अधिकारी डॉ. श्री. टेकवाणी :- बालरोग तज्ञ म्हणून आपले शहरातील हे प्रसिध्द डॉक्टर आहेत. आपले कडेस बालरोग तज्ञ नसलेने त्यांना पूर्वीपासून मानधनावर नेमण्यांत येते. त्यांचे आठवडयाचे वार ठरलेले असतात त्यावेळी ते हॉस्पीटल मध्ये उपस्थित राहून आपली सेवा देतात. इर्मजन्सी मध्ये त्यांना फोन करून बोलविण्यांत येते.

मा.श्री. तिवारी सु.र.:- दहा वर्षापासून बालरोग तज्ञ म्हणून आपले कडेस यांना मानधनावर नेमणेत येते.

मु.वै.अधिकारी डॉ.श्री. टेकवाणी :- त्याच्या नेमणूकीच्या अजेंडया वरील दिनांक ५/१०/२००७ ते दि. ४/१०/२००९ या तारखा चुकीच्या उल्लेखिलेल्या असून दिनांक २१/४/२००८ ते दिनांक २०/१०/२००८ अखेर मानधनावर नेमणूका करणेस मंजूरी मागितलेली आहे.त्या प्रस्तावा नुसार सहा महिन्यांचे कालावधीसाठी नेमणूका करणेस मंजूरी मिळावी.

मा. सौ. दिघे वि.रा. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. शिंदे द.बा. :- ऑफिस मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करणेत यावा. बालरोग तज्ञ यांना दिनांक २१/४/२००८ते दिनांक २०/१०/२००८ या सहा महिन्याचे कालावधीसाठी मानधनावर नेमणूका देण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव** :-अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह येथे बालरोग तज्ञ म्हणून डॉ.श्री. सुभाष फिरोदिया, डॉ.श्री. अनिरूध्द गिते व डॉ.श्री. सुचित तांबोळी यांची बालरोग तज्ञ म्हणून दिनांक २१/४/२००८ ते दिनांक. २०/१०/२००८ अखेर दरमहा रूपये १५००/- ( रूपये एक हजार पांचशे फक्त) चे मानधनावर नेमणुका करणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा. सौ. दिघे विमल रामचंद्र

अनुमोदक :- मा.श्री. शिंदे दशरथ बाबु.

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-४**
सन २००८-२००९.

विषय क्रमांक-६ मंगळवार दिनांक १३/५/२००८

ठराव क्रमांक -६ मंगळवार दिनांक १३/५/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीतील महात्मा फुले चौक ते सारसनगर पुला पर्यत रस्ता कॉक्रीट करणे कामी मागविण्यात आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** प्रस्तावना-विषय-निविदा मंजूरी बाबत.

कामाचे नांव :- महात्मा फुले चौक ते सारसनगर पुलापर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे.

महोदय,

उपरोक्त विषयी खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१. प्रशासकीय मान्यता :- मा. शासन निर्णय २१०७/८४० दि. ३/१०/०७ अन्वये कामास मंजुरी
२. प्रशासकीय मान्यता रक्कम :- रू. १४,०४,३०२/-
३. तांत्रिक मान्यता रक्कम :- रू. १४,०४,३०२/-
४. तांत्रिक मान्यतेची दरसुची :- २००७-०८
५. निविदा ( परिशिष्ट 'ब' ) रक्कम :- रू. १३,७०,०५०/-
६. निविदा प्रसिध्दी तारीख :- १३/३/२००८
७. निविदा विक्री कालावधी :- दि. १३/३/०८ ते २४/३/०८ ( पंधरा दिवस)
८. निविदा स्विकारण्याची तारीख :- २६/३/२००८
९. निविदा उघडण्याची तारीख :- १/४/२००८
१०. कामाची मुदत :- ६ महिने
११. प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील :-

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | देकार |
|---|---|---|
| १ | श्री. सुनिल राउत | ४० % जादा |
| २ | श्री. संतोष जोंधळे | ३५ % जादा |

वरील तुलनात्मक तक्ताच्या अनुषंगाने श्री. संतोष जोंधळे यांचा देकार सर्वात कमी म्हणजे निविदे रकमेपेक्षा ३५ %जादा आहे. ठेकेदारास वाटाघाटीसाठी दि. ४/४/२००८ रोजी पत्र दिले असता त्यांनी दि. ८/४/०८ चे पत्रान्वये दर कमी करून सुधारित देकार २६% जादा केला आहे. सदर प्रस्ताव मा.छाननी समिती समोर दि. १७/४/०८ रोजी चर्चेस ठेवला होता.

मा. छाननी समितीने शिफारस केल्यानुसार सदर देकार चालू दरसुचीशी तुलना करता ९.७२ % जादा येत आहे. सदर निविदा चालू दरसुचीच्या तुलनेत ९.७२ % जादा दराची असल्याने अवलोकनार्थ व स्थायी समितीच्या मंजूरीस्तव सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीतील महात्मा फुले चौक ते सारसनगर पुला पर्यंत रस्ता कॉक्रीट करणे कामी मागविण्यात आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रस्तावाची माहिती सांगावी.

शहर अभियंता श्री.पालवे व्ही.डी. :- सदर कामी जाहिर निविदा मागविल्या असता निविदा रक्कमेच्या ३५ % जादाचे निविदा दर प्राप्त झालेले आहेत. कमीचे निविदा दरधारक यांनी निगोशिएशन नंतर निविदा दर कमी करून २६% केलेले आहेत.त्याची चालू दरसुचीशी तुलणा करता हे दर ९.७२% जादाचे येत असलेने प्रस्ताव मंजूरीसाठी सादर केलेला आहे.

मा.सौ. दिघे वि.रा.:- ऑफिस रिपोर्ट मंजुर करावा.

मा.श्री. शिंदे द.बा. :- मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीतील महात्मा फुले चौक ते सारसनगर पुला पर्यंत रस्ता कॉक्रीट करणे कामी मागविण्यात आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता छाननी समितीने शिफारस केल्यानुसार कमीचे निविदा दरधारक श्री. संतोष जोंधळे यांचे सुधारीत देकारानुसार निविदा रकमे पेक्षा २६ % ( सव्वीस टक्के) जादाचे दरास (चालु दर सुचीच्या तुलणेत ९.७२ % (नऊ पुर्णाक बहात्तर शतांश टक्के)जादाचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ. दिघे विमल रामचंद्र

अनुमोदक :- मा.श्री.शिंदे दशरथ बाबु.

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-४**
सन २००८-२००९.

विषय क्रमांक-७ मंगळवार दिनांक १३/५/२००८

ठराव क्रमांक -७ मंगळवार दिनांक १३/५/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेची शहर बस सेवा चालविण्यांस दिलेल्या अहमदनगर प्रवासी व माल वाहतुक संस्थेचे बॅन्क गॅरंटी मधून तुर्त रक्कम रूपये ५,९१,२००/- बॅन्केचे कर्ज हप्त्यापोटी भरणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** विषय-अहमदनगर मनपाचे शहर बस वाहतूकीचे थकीत बँक कर्ज हप्त्याबाबत.
संदर्भः-दि महानगर को-ऑप बँक लि.यांचे दि..९/४/०८व दि. १७/४/०८.चे पत्र.

मा.सादर,

अहमदनगर महानगरपालिकेच्या शहर बसेस करिता महानगर बॅकेने वित्त पुरवठा केलेला आहे. तथापी अभिकर्ता संस्था यांनी बँक हप्ता थकविला असून थकीत हप्ता रूपये ५,९१,२००/- इतका असून संदर्भिय पत्रान्वये भरणे बाबत कळविले आहे. अभिकर्ता संस्था यांनी मनपाकडे रूपये २५.०० लाख इतकी बँक गॅरंटी ठेवली होती. यापूर्वी सदर बँक गॅरंटीमधून १० लाख रक्कम बँकेस दिलेली आहे. तथापी अभिकर्ता ने बॅक गॅरंटी पूर्ववत केलेली नाही.

संदर्भिय पत्रान्वये बँक हप्ता भरणेबाबत कळविले असता, अभिकर्ता संस्था यांना मो.व्हे. जा.नं. २७/ २३-४-२००८ अन्वये कळविण्यांत आलेले आहे. तसेच बॅक हप्त्याची रक्कम बँक गॅरंटीमधून तूर्त भरणेबाबत सविस्तर ऑफिस रिपोर्टास मान्यता घेणेत आली असून सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती कडे मंजूरीकरिता पाठविणेत येत आहे.

येणे प्रमाणे मॅके. इंजि. यांचा अहवाल असे.
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.
हा विषय सभे मध्यें वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्यें झालेली चर्चा.

मा.उपायुक्त श्री.हांगे साहेब :- मॅकेनिकल इंजिनिअर श्री. पी.जे. निकम यांना सभेमध्ये बोलवावे.
त्याप्रमाणे मॅके.इंजि. श्री. निकम पी.जे. हे सभेत उपस्थित झाले.

मा.सभापती साहेब :- प्रस्तावाची माहिती द्यावी.

मॅके.इंजि.श्री.निकम पी.जे.:- शहर बस वाहतुक चालविण्यांस दिलेली अभिकर्ता संस्था ही बॅन्केमध्ये वाहन कर्जाचे हप्ते भरत नाहीत. त्यांनी आपले कडेस रू. २५ लाख बॅन्क गॅरंटी ठेवलेली होती. त्यामधून या पूर्वी बॅन्केचे कर्ज हप्त्या पोटी रूपये दहा लाख आपण बॅन्केत भरलेले आहेत. त्यांनी आपली रॅायल्टीची रक्कम तसेच आर.टी.ओ चे कर थकविलेले आहेत.हया सर्व शिल्लक देण्यांचा विचार केल्यास आपले कडील उर्वरित बॅन्क गॅरंटीचे १५ लाखाची रक्कम ही शिल्लक रहात नाही. बॅन्क गॅरटी शिल्लक रहात नसलेने बस सेवे बाबत सभेने योग्य तो निर्णय घ्यावा.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- आपण बसचे कर्जा करितां गॅरंटर आहोत. त्यांनी बॅन्केचे हप्ते, आपली रॅायल्टी तसेच आर.टी ओ. चे कर भरलेले नाहीत.

मॅके.इंजि.श्री. निकम पी.जे. :- बससेवा चालू ठेवावी किंवा कसे यांचा सभेने निर्णय घ्यावा. अभिकर्ता संस्था आपले कडेस अगर बॅन्के कडेस कुठलाही भरणा करीत नाही.

मा.श्री. मैड स.ब. :- त्यांना तसी समज दिली आहे काय ? पर्यायी व्यवस्था काय ?

मॅके.इंजि. श्री.निकम पी.जे. :- समज दिलेली आहे नोटीस दिलेली आहे.

मा.उपायुक्त श्री.हांगे साहेबः-सदरअभिकर्ता संस्थेने म.न.पा.ची रॉयल्टी रू.४.५० लाख,६ लाख शासनाचे कर रू.४.५०लाख व बॅन्केचा हप्ता रू.६ लाख अशी देणी थकविलेली असून ही देणी पहाता त्यांची बॅन्क गॅरंटी शिल्लक रहात नाही.नवीन अभिकर्ता आल्यास चांगले का ?

मा.श्री.तिवारी सु.र.:- बस ताब्यात घेउन आपले मार्फत बस सेवा चालू ठेवावी.

मा.श्री. कोतकर भा.ए.:- बस सेवा बंद झाल्यास नागरिक नावे ठेवतील बस सेवा बंद पडू नये या करिता मा.आयुक्त,मा.उपायुक्त,मा.महापौर,मा.उपमहापौर,विरोधी पक्ष नेता, सभागृह नेता, सभापती स्थायी समिती,म.न.पाचे इतर अधिकारी आर.टी.ओ. चे अधिकारी तसेच बॅन्केचे अधिकारी यांचे सह बस सेवे विषयी संयुक्त मिटींग घेण्यात येउन योग्य निर्णय घ्यावा.

मा.श्री.शेख आरिफ शे.र.:- संयुक्त मिटींग घेण्यांत यावी. प्रस्ताव पुढील स्थायी समितीचे सभेत घेण्यांत यावा.

मा.सभापती साहेबः-सदर प्रकरणी मा.आयुक्त साहेब,मा.उपायुक्त,मा.महापौर,मा.उपमहापौर, विरोधी पक्ष नेता,सभागृह नेता,सभापती स्थायी समिती म.न.पाचे इतर अधिकारी आर.टी.ओ.चे अधिकारी तसेच बॅन्केचे अधिकारी यांचेसह बस सेवे विषयी संयुक्त मिटींग घेउन पुढील मार्ग काढणेत यावा.हा प्रस्ताव पुढील सभेमध्ये निर्णयासाठी घेणेत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेची शहर बस सेवा चालविण्यांस दिलेल्या अहमदनगर प्रवासी व माल वाहतुक संस्थेचे बॅन्क गॅरंटी मधून तुर्त रक्कम रूपये ५,९१,२००/- बॅन्केचे कर्ज हप्तापोटी भरणेस मंजूरी मिळणे बाबतचे ऑफिस रिपोर्टावर सभे मध्ये झालेल्या चर्चेनुसार सदर प्रकरणी मा.आयुक्त साहेब,मा.उपायुक्त,मा.महापौर, मा.उपमहापौर, विरोधी पक्ष नेता,सभागृह नेता ,सभापती स्थायी समिती, म.न.पाचे इतर अधिकारी आर.टी.ओ.चे अधिकारी तसेच बॅन्केचे अधिकारी यांचे सह बस सेवे विषयी संयुक्त मिटींग घेण्यांत यावी.

सदर प्रस्ताव स्थायी समितीचे पुढील सभेमध्ये निर्णयासाठी घेणेत यावा.

सुचक :- मा.श्री. कोतकर भानुदास एकनाथ

अनुमोदक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,<br>स्थायी समिती<br>अहमदनगर महानगरपालिका